महाराष्ट्र शासन

कृषि विभाग

## कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा)

# यशोगाथा

# मधमाशा पालन

शेतक-याचे नांव - श्री. विलास शंकर चरडे

रा. पो. - वायगांव (भो.), ता. - वरोरा, जि. - चंद्रपूर



-: कार्यालय :-

तालुका कृषि अधिकारी

वरोरा

# यशोगाथा

## मधमाशा पालन



**श्री. विलास शंकर चरडे**

**रा. वायगांव (भो.), पो. चारगांव (बु.),**

**तालुका - वरोरा, जिल्हा - चंद्रपूर**

**दुरध्वनी क्र. - ८८०६७०५५७९**

शेतक-यांना निसर्गाशी सतत झगडावे लागत असल्यामुळे सातत्याने प्रतिकुल परिस्थितीला आणि आर्थिक अनिश्चिततेला तोंड द्यावे लागते. पैशाच्या अडचणी, कर्ज, व्याज, लाचारी व गरिबी या चक्रातून तो सातत्याने सापडला असतो. जर शेतक-याने आपल्या शेतामध्ये छोटा मोठा जोडधंदा केला तर तो या अडचणी वर मात करु शकतो आणि स्वाभिमानी, स्वावलंबी, कर्जमुक्त, स्वस्थ जिवन जगु शकतो. जोडधंद्यामध्ये अलीकडच्या काळात विकसित झालेला चांगला जोड धंदा म्हणजे मधमाशा पालन. मधमाशा जंगलामध्ये किंवा जमेल त्या झाडावर पोळे तयार करुन त्यात मध साठवतात. ते मध गुराखी अथवा तत्सम व्यक्ती हस्तगत करुन मधावर यथेच्छ ताव मारतात. मात्र हेच मधमाशाचे पालन व्यवस्थित केले आणि त्यापासून मिळणारे मध एकत्रित करुन बाटल्यांमध्ये भरुन विकला तर तो शेतक-यांना कष्टप्रद जिवनामध्ये संजीवनी मंत्रासारखा ठरतो.



श्री. विलास शंकर चरडे हे ३३ वर्षीय युवा शेतकरी, १२ वी , आयटीआय पर्यंत शिक्षण झालेले शेतकरी कुटूंबातील असून, आर्थिक परिस्थिती जेमतेमच, त्यांच्याकडे त्यांच्या वाट्याला वडिलोपार्जित २ एकर शेती आणि त्या शेतीमध्ये ओलीताची सोय नसल्यामुळे ते पूर्णपणे नैसर्गीक पाण्यावर शेती करतात. शेतीमध्ये

खरीप हंगामात मुख्यतः कापूस, सोयाबिन, तूर तर रब्बी हंगामात जमिनीमध्ये ओल असल्यास हरभरा व गहू इत्यादी पिके ते घेतात.



वडिलोपार्जित शेती असल्यामुळे ते पूर्णतः शेतीच्या उत्पादनावर आपल्या कुटूंबाचे पालन पोषण करायचे. परंतू निसर्गाच्या बदलत्या चक्रामुळे शेतीमध्ये केलेला खर्च सुध्दा निघत नव्हता. कोरडवाहू शेती असल्यामुळे त्यांना शेतीमध्ये फारशे उत्पादन येत नाही. त्यामुळे शेती हा व्यवसायासोबतच मजूरी व इतर कामे करण्याचे त्यांनी ठरविले व चार - पाच वर्षे त्याप्रकारे त्यांनी उपजिविका केली. मुळातच जिाे स्वभावाचे असलेले विलास चरडे यांनी शेती या व्यवसायामध्ये हार मानलेली नव्हती त्यांना नेहमी वाटायचे की, शेती या व्यवसायाला दुसरा पूरक व्यवसाय असणे आवश्यक आहे. अशातच शेतीला पूरक जोडधंदा करण्याचे त्यांच्या मनात आले.

कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अंतर्गत सन २०१८-१९ मध्ये वायगांव (भो.) या गावात कृषि संलग्न घटक अंतर्गत मधमाशा पालन शेतीशाळा आयोजित करण्यात आली. या शेतीशाळेमध्ये विलास यांना सहभागी करण्यात आले. शेतीशाळेच्या माध्यमातून मधमाशा पालन व्यवसाय हा अत्यल्प खर्चाचा व्यवसाय असल्याचे त्यांच्या लक्षात आले. व मधमाशा पालनाचे प्रात्यक्षिकासह संपूर्ण निशुल्क प्रशिक्षण विलास यांना या शेतीशाळेच्या माध्यमातून मिळाले. त्यामध्ये त्यांना मधमाशा हाताळणी ते विक्री व्यवस्थापनाचे संपूर्ण धडे मिळाले.



मधमाशा पालनास सुरुवात करण्याचे विलास यांचे मानात आले. परंतू मधमाशा पालनासाठीचे साहित्य कुठुण मिळवावे व

त्यासाठीच पैशाची तडजोड विलास यांना जम ना, तेव्हा त्यांनी तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक यांचेशी संपर्क साधून आत्मा अंतर्गत प्रात्यक्षिक मिळाल्यास मधमाशा पालन व्यवसाय सुरु करण्याचे मानस दाखविले.




शेतकरी श्री. विलास चरडे यांनी श्री.व्ही. डी. घागी, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक व श्री. ए. पी. बगाडे, मधु क्षेत्रिक, खादी ग्रामोद्योग यांचेकडून मधमाशापालन व्यवसायासंबंधी परीपूर्ण माहिती घेऊन, त्यांच्या मार्गदर्शनाखाली शेती व शेतीला पुरक व्यवसाय म्हणून मधमाशापालन व्यवसाय करण्यास सुरुवात केली. आर्थिक पाठबळ कमी असल्यामुळे कृषि **तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अंतर्गत संलग्न विभाग प्रात्यक्षिक या घटकांतर्गत रक्कम रु.४०००/- चे मर्यादेत दोन मधमाशापालन पेटी संच, स्वार्म नेट, बिव्हेल इत्यादी साहित्य त्यांनी खरेदी करीता अनुदान वळती करण्यात आले.** मेहनती व जिा स्वभावाचे असलेल्या विलास चरडे यांनी दोन मधपेटी पासून व्यवसाय सुरु करुन, आज रोजी त्यांच्या जवळ १० मधमाशांच्या पेट्या उपलब्ध आहेत.



मधमाशा पालन व्यवसाय करण्याकरीता त्यांनी मधमाशांचे जिवनचक्र समजावून घेतले, मधपेटीची दर आठ दिवसांनी ते पाहणी करुन, पाटा साफ करणे त्याच बरोबर पोळे फ्रेमच्या मध्यभागी आहे किंवा नाही ते पाहणे जर पोळे फ्रेमच्या मध्यभागी नसल्यास ते मध्यभागी करणे इत्यादी कामे ते नियमित करतात. एका मधपेटीमध्ये सात ते आठ फ्रेम बसवुन फ्रेमला मधमाशांनी पोळे तयार केल्यानंतर त्यावर एक सुपर चेंबर (पेटी) त्यामध्ये मधमाशांनी एक महिन्यात संकलित केलेले मध विलास एकत्रित करतात. एका मधपेटीमधून तिन किलो मध (सहद) एका महिन्यात

निघत असून, वर्षाकाठी एका मधपेटीतून १२ ते १५ किलो मध मिळत असल्याचा विलास यांचा अनुभव आहे.



या व्यवसायाकरीता कुठलिही मोठी गुंतवणुक, जागा तसेच दररोज विशेष देखभाल करावी लागत नसल्याचे विलास यांचे म्हणने आहे. कोरडवाहू शेती करुन त्यांना निव्वळ मधमाशा पालनामधुन वर्षाकाठी ९०-१०० किलो मा उपलब्ध होत असुन प्रती किलो रु.५००/- प्रमाणे मध विक्री करुन रक्कम रु.४८०००/- त्यांना मिळाल्याचे विलास सांगतो. तसेच मधाला ग्राहकांची मागणी ही जास्त असल्यामुळे, बाजारामध्ये मध विक्रीकरीता न्यावे लागत नसून, विक्री ही घरबसल्या होते. तसेच मधमाशा पेट्यांची विक्री वसाहतीसह प्रती पेटी ६ हजार याप्रमाणे करुन त्यांना वर्षाला साधरणतः १०-१५ मधपेट्यांच्या विक्रीतुन रु.९०,०००/- प्राप्त झाल्याचे विलास यांनी सांगितले. मधमाशी पालनाकरिता सुरुवातीचा पेट्या खरेदीचा खर्च वगळता इतर कुठलाही आर्थिक खर्च नसल्याने **मध व्यवसायातुन त्यांना वार्षिक रक्कम रु.१,३८,०००/- येवढे उत्पन्न झाले.**



तसेच मधमाशापालन व्यवसाय करणा-या शेतक-यांनी कृषि विभागाच्या कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) योजने अंतर्गत "महात्मा ज्योतीबा फुले मधमाशी पालन शेतकरी गट, वायगांव (भो.)" हा गट स्थापन करुन गटाची नोंदणी केलेली आहे. व गटातील सर्व सदस्य शेती या व्यवसायासोबतच मधमाशापालन हा व्यवसाय करतात. त्यामुळे मधमाशा पालन व्यवसाय हा शेतीपूरक व्यवसाय ठरत असून, या व्यवसायामुळे शेतक-यांच्या आर्थिक उत्पन्नात नक्कीचं भर पडत आहे.

-------- // --------